# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०२/०५/२०२५ (शुक्रवार)**

---

## मा. मुख्यमंत्री यांच्या १०० दिवस कृती आराखडा उपक्रमामध्ये नागपूर ग्रामीण जिल्हा पोलीस महाराष्ट्रातून दुसऱ्या क्रमांकावर

मा. मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य यांच्या संकल्पनेतुन प्रशासनाला गतीमानता येण्यासाठी 'क्षेत्रीय कार्यालयांसाठी १०० दिवसांचा कृती आराखडा हा उपक्रम सुरू करण्यात आला. सदर उपक्रम हा दि. ०७ जानेवारी २०२५ ते दि. १६ एप्रिल २०२५ दरम्यान राबविण्यात आला. यामध्ये महाराष्ट्र शासनाच्या सर्व विभागांचा समावेश होता. या १०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणा विशेष मोहिमेचे मुल्यमापन हे **'भारतीय गुणवत्ता परिषद'** (Quality Council Of India) या संस्थे मार्फत करण्यात आले. त्यामध्ये पोलीस विभागा अंतर्गत पुर्ण महाराष्ट्र राज्यातुन सर्वोत्तम ५ पोलीस अधीक्षक कार्यालय यांची निवड करण्यात आली त्यामध्ये **पोलीस अधीक्षक कार्यालय नागपूर ग्रामीण** ने **संपुर्ण राज्यातुन १०० पैकी ८० गुण मिळवुन व्दितीय क्रमांक मिळविला.**

या विशेष मोहिम अंतर्गत १) संकेत स्थळ (मइेपजम) २) केंद्रशासनाशी सुसंवाद ३) स्वच्छता ४) तक्रार निवारण ५) कार्यालयीन सोयी सुविधा ६) कामकाजातील सुधारणा ७) अधिकारी कर्मचारी यांचे प्रशिक्षण, सेवा विषयक बाबी आणि कृत्रीम बुध्दीमत्ता तंत्रज्ञानाचा वापर (ıतजपपिबपंस प्दजमससपहमदबम) ८) आर्थिक व औद्योगिक गुंतवणुकीस प्रोत्साहन ९) नाविन्यपुर्ण उपक्रम प – सुकर जीवनमान १०) नाविन्यपुर्ण उपक्रम पप – कार्यालयीन व्यवस्थापन सुधारणा या मुद्यांवर प्रभावी कार्यवाही करण्याबाबत निर्देश देण्यात आले होते. नागपूर ग्रामीण पोलीस घटकाने या उपक्रमा अंतर्गत देण्यात आलेले उद्दिष्टे १०० टक्के पुर्ण करून

पारदर्शक, लोकाभिमुख आणि आधुनिक पोलिसींगच्या दिशेने महत्वपुर्ण पावले उचलण्यात आली आहेत.

पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर ग्रामीण जिल्हा या ठिकाणी आज दि. ०२/०५/२०२५ रोजी पत्रकार परिषद आयोजित करून श्री. दिलीप पाटिल भुजबळ, विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र, नागपूर यांनी पत्रकारांना दिली. सदर वेळी नागपूर ग्रामीण जिल्हा पोलीस दलाचे प्रभारी पोलीस अधिक्षक श्री. रमेश धुमाळ तसेच श्री. दिपक अग्रवाल, उपविभागीय पोलीस अधिकारी, नागपूर विभाग, नागपूर, श्री. संतोष गायकवाड, उपविभागीय पोलीस अधिकारी, कन्हान उपविभाग कन्हान तसेच इतर पोलीस अधिकारी व अंमलदार उपस्थित होते






## ड्राय डे चा फायदा घेण्यासाठी अवैधरित्या देशी, विदेशी व मोहाफुलांची दारू विक्री करणाऱ्या आरोपीतांविरूध्द पोलीस स्टेशन सावनेर ची धडक कारवाई एकूण ४ ठिकाणी छापेमारी करून ४ गुन्हे नोंद

दिनांक ०१/०५/२०२५ रोजी महाराष्ट्र स्थापना दिवस निमित्ताने मा. जिल्हाधिकारी, नांगपूर यांनी नागपूर शहर व ग्रामीण हद्दीत सर्व प्रकारची दारू विक्री करण्यास मनाई आदेश काढून बंदि 'ड्रय डे' घोषीत केला होता. सदर आदेशान्वये पोलीस स्टेशन सावनेर हद्दीतील सर्व परवानाधारक मद्य विक्री तसेच परमीट रूम बंद असल्याने अवैधरित्या विनापरवाना दारू विकणारे

आरोपी ड्राय डे चा फायदा घेवून स्वत:चे आर्थिक फायद्याकरिता दारू विक्री करित असल्याची सावनेर पोलीसांना गुप्त माहिती मिळाल्याने मिळालेल्या माहितीवरू पो.स्टे. सावनरे येथील पोलीस स्टॉफ ने पो.स्टे. सावनेर हद्दीत ४ ठिकाणी अवैधरित्या देशी, विदेशी व मोहफुलांची दारू बाळगून विक्री च्या ठिकाणी छापा टाकूण अवैधरित्या दारू विक्री करणारे आरोपींकडून किंमती ३३,८७०/— रू. ची विदेशी दारू., रू. ७४,३४०/— ची देशी भिंगरी दारू व रू. १९००/— ची मोहाफुलाची गावठी दारू असा एकुण १,१०,११०/— रू. चा मुद्देमाल जप्त करून आरोपींविरूध्द महाराष्ट्र दारूबंदि अधिनियमान्वये गुन्हे दाखल करण्यात आले. आरोपी नामे १) संजय दिनकर खडतकर रा. पाटणसावंगी २) दिलीप तेजराम कोहळे रा. चांपाता सावनेर + इतर व ३) अरविंद वामन मरस्कोल्हे रा. पाटणसावंगी तसेच २ महिला आरोपी असे **एकूण ७ आरोपींविरूध्द ४ गुन्हे दाखल केले आहे.**

सदर कारवाई मा. अनिल म्हस्के, उपविभागीय पोलीस अधिकारी, सावनेर उपविभाग, सावनेर यांच्या मार्गदर्शनात पोनि उमेश पाटील, ठाणेदार पो.स्टे. सावनेर व पोलीस स्टॉफ यांनी केली.



## पो.स्टे. बोरी हद्दीत सट्टापट्टी लिहणाऱ्या आरोपींविरूद्ध कारवाई

दिनांक ०१/०५/२०२५ रोजी पोलीस स्टेशन बोरी येथील पोलीस स्टॉफ पो.स्टे. हद्दीत पेट्रोलींग करीत असता गोपनीय माहिती मिळाली की, राज पॅलेस कॉम्प्लेक्स् च्या समोर, बुटीबोर तसेच त्याच्या बाजूला काहि अंतरावर वेगवेगळ्या ठिकाणी २ इसम ग्राहकांकडून पैसे घेवून सट्टापटी लिहून खायवाडी करित असल्याची गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाल्याने पो. स्टे. बोरी येथील पोलीस स्टॉफ ने दोन्ही ठिकाणी पंचासह रेड केली असता आरोपी नामे 1) संदिप देवरावजी उईके वय ३८ वर्ष रा.क्रांती चौक वार्ड क्र.०५ बुटीबोरी ता.जि. २) निखिलेश गोपाल पाठक वय २३ वर्ष रा. वार्ड क्र.०६ बुटीबोरी ता.जि. असे घटनास्थळावर सट्टापट्टी चालवितांना प्रत्यक्ष मिळून आले व सदर आरोपींची अंगझडती घेतली असता त्यांचे ताब्यातून सट्टापट्टीचे साहित्य व नगदि असा एकुण २,९८०/— रू. चा मुद्देमाल जप्त करून आरोपींविरूद्ध कलम १२(अ) महाराष्ट्र जुगार प्रतिबंध अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. **एकूण ७ आरोपींविरूध्द ४ गुन्हे दाखल केले आहे.**

## अवैधरित्या देशी, विदेशी व मोहाफुल दारू विक्री करणाऱ्या आरोपीतांविरूध्द पोलीस स्टेशन कळमेश्वर ची धडक कारवाई (एकूण ९ ठिकाणी छापेमारी करून ९ गुन्हे नोंद)

दिनांक ०१/०४/२०२५ रोजी पोलीस स्टेशन कळमेश्वर येथील येथील पोलीस स्टॉफ ला अवैध दारू विक्रीबाबत मिळालेल्या गुप्त बातमी वरून पोलीस स्टेशन कळमेश्वर येथील पोलीस स्टॉफ ने पो.स्टे. कळमेश्वर हद्दीतील हद्दीतील मौजा **डोरली भिंगारे, वार्ड क्र ०२ चिंचभवन खदान ,चौदामैल ते गोंडखैरी रोड कळमेश्वर, वार्ड क्र. १० कळमेश्वर ,पारडी देशमुख बाजार चौक कलमेश्वर, खडगाव आणि फेटरी** अशा विविध ठिकाणी अवैधरित्या देशी, विदेशी आणि मोहफुलांची गावठी दारू बाळगून विक्री करणारे आरोपींवर छापा टाकूण देशी दारू किंमती ६९३०/— रू, विदेशी दारू किंमती ५९९०/— रू आणि मोहफुलांची गावठी दारू किंमती

५१,५००/— रू. अशी **एकूण किंमती ६४,४२०० रू. किंमतीची दारू** जप्त करून आरोपींविरूध्द कलम ६५ (ई) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहे. आरोपी नामे १) अमोल मनोहर बावणे, वय ३२ वर्ष राह. वार्ड क्र. ०१ व्याहाळ ता. जिल्हा नागपूर २) रामु भगवानराव कामडे वय ५५ वर्ष रा.डोरली भिंगारे ता.काटोल ३) ज्ञानेश्वर नथ्थुजी गौरखेडे, वय ६८ वर्ष, रा. वार्ड क्र. १० कळमेश्वर ४) कैलास राजय्या बंडीपिल्लेवार, वय ४५ वर्ष, राह. पारडी देशमुख कळमेश्वर ५) लक्ष्मण गणपत सुशिर, वय ५० वर्ष, राह. वार्ड क्र. १४ कळमेश्वर ६) गिरीधर शांतीपाणी तांडी वय ४९ वर्ष रा.खडगाव ७) तीर्थराज शंकर कडरले वय ४३ वर्ष रावार्ड क्र. ०३ फेटरी तसेच २ महिला आरोपी असे **एकूण ९ आरोपींविरूध्द ९ गुन्हे दाखल केले आहे.**

## अवैधरित्या देशी दारू विक्री करणाऱ्या आरोपीताविरूध्द गुन्हे नोंद
## पोलीस स्टेशन केळवद ची कामगिरी एकूण ३ कारवाया ३ गुन्हे नोंद

दिनांक ०१/०४/२०२५ रोजी पोलीस स्टेशन केळवद येथील पोलीस स्टॉफ ला अवैध दारू विक्रीबाबत मिळालेल्या गुप्त बातमी वरून पोलीस स्टेशन केळवद येथील पोलीस स्टॉफ ने पो.स्टे. केळवद हद्दीतील मौजा **खानगाव , सावनेर ते बैतुल हायवे रोड उमरी आणि केळवद वार्ड क्र ०५ असे विविध ठिकाणी** अवैधरित्या देशी भिंगरी दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकूण एकूण १४३५/— रू. ची देशी भिंगरी दारू जप्त करून आरोपींविरूध्द कलम ६५(ई) महाराष्ट्र दारूबंदि कायद्यान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहे. आरोपी नामे १) विजय डोमाजी काळे वय ५० वर्ष रा. उमरी २) शंकर मल्हारी बुरेलवार वय ६६ वर्ष रा. वार्ड न ०५ केळवद ता सावनेर ३) सेवकराम लच्छीराम कदरे वय ६५ वर्ष रा. वार्ड क्र ३ खानगाव ता सावनेर असे **एकूण ३ आरोपींविरूध्द ३ गुन्हे दाखल केले आहे.**

# अवैधरित्या मोहफुलांची गावठी दारू विक्री करणाऱ्या आरोपीताविरूध्द गुन्हे नोंद
# पोलीस स्टेशन खापा ची कामगिरी एकूण ४ कारवाया ४ गुन्हे नोंद

दिनांक ०१/०४/२०२५ रोजी पोलीस स्टेशन खापा येथील पोलीस स्टॉफ ला अवैध दारू विक्रीबाबत मिळालेल्या गुप्त बातमी वरून पोलीस स्टेशन खापायेथील पोलीस स्टॉफ ने पो.स्टे. खापा हद्दीतील मौजा **कोथुळना, घरकुल कॉलोनी खापा, नागलवाडी असे विविध ठिकाणी** अवैधरित्या मोहफुलांची गावठी दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकूण एकूण ३०००/— रू. ची मोहफुलांची दारू जप्त करून आरोपींविरूध्द कलम ६५(ई) महाराष्ट्र दारूबंदि कायद्यान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहे. आरोपी नामे १) मायगो मधुकर वरखडे वय ३६ वर्ष रा कोथुळना ता सावनेर जि नागपूर २)विनायक श्रीराम नेवारे वय ५२ वर्ष रा. घरकुल कॉलोनी खापा ता. सावनेर जि. नागपूर ३) राजेश धनराज तागडे वय ४२ वर्ष रा. वाकी ता. सावनेर जि. नागपूर ४)अरविंद यादोराव खोब्रागडे वय ५० वर्ष रा. नागलवाडी ता. सावनेर जि. नागपूर असे **एकूण ४ आरोपींविरूध्द ४ गुन्हे दाखल केले आहे.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने